MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA
PIMPRI, PUNE-17

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# || संशोधक||

**पुरवणी अंक २८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- **शके १९४५**
- **वर्ष : ९२**
- **पुरवणी अंक : २८**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

●प्राचार्य डॉ. सुनील हेळकर ●प्रो. डॉ. प्रेमचंद गायकवाड ●प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांची शैक्षणिक कार्ये

- डॉ. प्रवीण सुभाषराव मोहिते ---------- १६७

४२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषी, जलसिंचन, सहकार या संदर्भातील विचार व कार्य

- प्रा. सुभाष बाजीराव शिंदे ---------- १७०

४३. लोकमानस व काळाची गरज ओळखणारे महाराज सयाजीराव गायकवाड

- किशोर जनार्दन लांडेपाटील ---------- १७४

४४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या मानवी मूल्यसंवर्धनातील योगदानाचा संकल्पनाचित्रणाद्वारे अभ्यास

- सौ. वर्षा किरण सरोदे ---------- १७८

४५. महाराष्ट्रातील प्रतिभावंत आणि बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड

-सहा.प्रा.ओंकार गणपत डोंगरे ---------- १८४

४६. महाराजा सयाजीराव गायकवाड व बडोदा संस्थानांतील ग्रामसुधारणा चळवळ

-डॉ.अंबादास धर्मा केत ---------- १९०

४७. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान

- डॉ. पांडुरंग किसन लोहोटे ---------- १९६

४८. ग्रंथप्रेमी सयाजीराव गायकवाड

- डॉ . तृप्ती सुभाष अंब्रे ---------- २००

४९. महाराजा सयाजीराजे गायकवाड यांच्या सामाजिक सुधारणा– ऐतिहासिक विश्लेषण

- डॉ. दीपक सो. वेडे ---------- २०४

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान

डॉ. पांडुरंग किसन लोहोटे
शारीरिक शिक्षण संचालक
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे – १७
मेल : pklohote@gmail.com, मोबाईल नंबर : ९७६३७०७६७८

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून भारत देशात अनेक राजे महाराजे होऊन गेले . ज्यांनी देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय , शैक्षणिक व आर्थिक विकासामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. त्यापैकी एक म्हणजे महाराज सयाजीराव गायकवाड होय. महाराजा सयाजीराव गायकवाड हे त्यांच्या कार्यशैलीमुळे इतिहासात अजरामर झालेले नाव आहे. तसेच यांना युगद्रष्टा असे म्हटले जाते कारण महाराजाचा ध्यास ,परिर्तन, तसेच महाराजांनी केलेल्या सुधारणा आजही प्रासंगिक आणि काळाची पाऊले ओळखणारे होते. महाराजा सयाजीराव गायकवाड़ यांनी भारताच्या सामाजिक, शैक्षणिक बांधणीत त्यांनी सर्वार्थाने काम केले. शेती, शिक्षण, प्रशासन, उद्योग, सामाजिक सुधारणा, न्याय यासंदर्भात त्यांचे योगदान मोठे आहे. त्याच बरोबर त्यांचे क्रीडा क्षेत्रातील कामगिरी व योगदान ही मोठे आहे .

राज्यातील नागरिकांना इतर सुविधांबरोबर विविध क्रीडा सुविधा मिळावा हा त्यांचा नेहमीच मानस असायचा. समाजातील नागरिकांनी आरोग्यदायी व सक्षम असावे या साठी त्यांनी अनेक क्रीडा सुविधा बरोबर क्रीडा प्रकारांचा समावेश आपल्या राज्यात केला. त्यामुळे नागरिकांचा सामाजिक बौद्धिक मानसिक विकास होऊन त्यांचा सर्वांगीण विकास करणे हा त्यांचा प्रयत्न असायचा. त्यामुळे त्यांच्या राज्यातील सर्व नागरिकांना विविध खेळ खेळावे यासाठी ते नेहमी तत्पर असत आणि ते आपल्या राज्यात विविध स्पर्धेचे आयोजन करत असत.

**संशोधनाचे उद्दिष्टे:**

१. महाराज सयाजीराव गायकवाड यांचा जीवन परिचय अभ्यासणे.
२. महाराज सयाजीराव गायकवाड यांचे क्रीडा क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला असून सदर संस्थानासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे . संस्थानाचा विषय व्यक्ती विषयक असल्यामुळे यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरी आणि योगदानाचा अभ्यास केला आहे. या अभ्यासासाठी विविध संशोधन लेख, संदर्भ साहित्य, वर्तमान पत्र व गुगल सर्च मध्ये उपलब्ध माहिती वरून साहित्याचा आठवा घेऊन व माहिती एकत्रित करण्यात आली आहे .

**महाराजा सयाजीराव गायकवाड गायकवाड यांचा जीवन परिचय :**

महाराजा श्रीमंत सयाजीराव खंडेराव गायकवाड (तिसरे), यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील कौळाणे गावी दि. ११ मार्च १८६३ रोजी झाला असून ते इ.स. १८७५ ते इ.स. १९३९ सालांदरम्यान बडोदा संस्थानचे अधिपती होते. अत्यंत कर्तृत्त्ववान संस्थानिक (कारकीर्द – १८८१–१९३९) होते. बडोदा संस्थानातील प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याकरता ते विशेषत्वाने ओळखले जातात.

सयाजीरावांचे वडील खंडेराव महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी महाराणी चिमणाबाई ७ मे १८८५ रोजी निधन पावली. त्याच वर्षी २८ डिसेंबर रोजी खंडेरावांचा दुसरा विवाह झाला. त्यांची तीन तरुण मुलेही अकालीच मरण पावली. सयाजीराव ७६वर्षाचे होऊन निधन पावले.

दिवाण सर टी. माधवराव यांनी सयाजीरावांना राज्यकारभाराचे शिक्षण दिले. २८ डिसेंबर १८८१ रोजी गादीवर आल्याबरोबर सयाजी रावांनी राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना केल्या. प्रशासकीय जबाबदारीची विभागणी हे तत्त्व राज्यकारभारात लागू करून राज्ययंत्रणेत त्यांनी सुरळीतपणा निर्माण केला, सल्लागार नेमून कल्याणकारी योजना अंमलात आणल्या (१८८३), न्यायव्यवस्थेत सुधारणा केल्या,. ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन केले (१९०४); तसेच